# महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा

## प्रज्ञा शोध व सर्वोत्कृष्टता केंद्र

**नौरोसजी वाडिया महाविद्यालय आवार, पुणे - ४११००१**

• वेबसाईट - **https://www.mtsexam.org** • ई-मेल - **ctsewadia@gmail.com**

**कार्यकारी मंडळ**

**डॉ. एम. के. सानप**
विश्वस्त,
मॉडर्न एज्युकेशन सोसायटी

**डॉ. ए. एस चांडक**
विश्वस्त,
मॉडर्न एज्युकेशन सोसायटी

**प्रा. सचिन सानप**
विश्वस्त,
मॉडर्न एज्युकेशन सोसायटी

**प्रा. जी. सी. कुलकर्णी**
सल्लागार
सी. टी. एस. ई.

**डॉ. ए. एस्. लिमये**
मानद संचालक,
सी. टी. एस. ई.

**प्रा. दिलीप शेंडे**
सहसंचालक
सी. टी. एस. ई.

**प्रा. बी. एस. देवरे**
सहसंचालक
सी. टी. एस. ई.

01/12/2022

मा. मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका

स. न. वि. वि.

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी परीक्षा दि. २६/४/२०२३ रोजी इयत्ता ८, ९, १० साठी होईल.** महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा २०२१ साठी बसलेल्या विद्यार्थ्यांची करोना काळातील निर्बंधांमुळे लांबलेली परीक्षा दि. ९/१०/२०२२ रोजी एकूण ९६ केंद्रावर सुरळीत पार पडली.

मागील जवळपास दोन वर्ष कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर अतिशय हालाखीचे दिवस गेले. सर्वच लोकांना ह्या काळात वेगवेगळ्या स्तरावर समस्यांना सामोरे जावे लागले. अर्थात (CTSE) सुद्धा ह्याला अपवाद नाही. या केंद्राचे मानद संचालक डॉ. एस. एम. घाटे सर ह्यांच्या अचानक निधनामुळे एम. टी. एस. परिवाराचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे. ह्या सगळ्या समस्यांतून सावरत सावरत आपण सर्वांनीच ही शैक्षणिक चळवळ चालू रहाण्यासाठीचे जे योगदान दिलेत ते खरोखरच कौतुकास्पद आहे.

येणाऱ्या काळात परीक्षेचे बदललेले वेळापत्रक तसेच सर्व क्षेत्रामध्ये येणाऱ्या अडचणी ह्यांवर आपणा सर्वांच्या मदतीने मात करून प्रा. जी. सी. कुलकर्णी सर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली आपण एम. टी. एस. परीक्षेचे नियोजन दरवर्षीप्रमाणेच एप्रिल २०२३ मध्ये करीत आहोत. ही परीक्षा पूर्वीप्रमाणे सुरळीत सुरू ठेवण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या विकासासाठी व त्यांना यथोचित मार्गदर्शन मिळेल यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आपण ह्यापूर्वी परीक्षेसाठी लागणारी मदत व वेळोवेळी केलेले मार्गदर्शन तितकेच महत्त्वाचे आहे.

या वर्षी विद्यार्थ्यांची संख्या पुन्हा वाढेल अशी अपेक्षा करतो. संपूर्ण महाराष्ट्राबरोबरच शेजारील गोवा, कर्नाटक व गुजरातमधील काही भागात एकाच दिवशी एकाच वेळी अतिशय शिस्तबद्ध रितीने, नीटनेटकेपणाने ही परीक्षा घेतली जाते हे आपण जाणताच. ग्रामीण व सामाजिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेत तसेच NMMS ह्या परीक्षेतही शहरी विद्यार्थ्यांच्या बरोबरीने मोठ्या संख्येने यशस्वी होत आहेत. सलग गेली अनेक वर्ष महाराष्ट्र राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेत देशात प्रथम क्रमांकावर राहिले आहे. तसेच राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेच्या यशात सहभागही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. इ. ८ वी ते १० वीच्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेची कार्यपद्धती व उद्दिष्टे ही प्रामुख्याने इ. १० वी व १२ वी पातळीवर होणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवरील खालील महत्त्वाच्या परीक्षांची तयारी करून घेणे हीच असतील.

१) किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना (KVPY), २) गणित / विज्ञान विषयातील ऑलिपियाड परीक्षा, ३) इंजिनियरिंग प्रवेशासाठी JEE Main / JEE Advanced / MHT-CET, ४) मेडिकल / डेंटल प्रवेशासाठी राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणारी (NEET) प्रवेश परीक्षा, ५) NDA प्रवेश परीक्षा

इ. ८ वी, ९ वी व इ. १० वीच्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेला त्या त्या वर्गाचा शालेय अभ्यासक्रमच असेल. परंतु प्रश्नांचे प्रकार व काठिण्य पातळी ही मात्र वर दिलेल्या परीक्षांप्रमाणे असेल. म्हणूनच इ. ८ वी ते १० वीच्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य ठरविणाऱ्या वरील महत्त्वाच्या परीक्षांची पूर्ण तयारी होईल व प्रज्ञावंत विद्यार्थ्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेण्याची संधी प्राप्त होईल. मागील काही वर्षात महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेला बसलेले अनेक विद्यार्थी SSB, IIM, UPSC, MBA मध्ये निवडले गेले आहेत.

आपल्या शाळेतून इयत्ता ८/९/१० वी चे किती विद्यार्थी परीक्षेला बसू इच्छितात हे कळविल्यास तेवढी आवेदन पत्रे पाठविण्याची व्यवस्था केली जाईल. अथवा आपल्या विभागातील आमच्या समन्वयकांशी संपर्क साधल्यास ते स्वत: आवेदन पत्रे पुरवतील. तसेच www.mtsexam.org या संकेत स्थळावरही आवेदन पत्र उपलब्ध करण्यात आले आहे. सोबत MTS चा एक फॉर्म पाठवित आहे. आपणास लागतील तेव्हढे झेरॉक्स करून घेऊ शकता. किंवा विद्यार्थी ऑनलाईन अर्ज भरू शकतात. (ऑनलाईन अर्ज भरल्यावर परत लेखी अर्ज भरू नये कोणत्याही एका माध्यमातून अर्ज एकदाच करावा.)

आत्तापर्यंत आपण आम्हाला सतत सहकार्य केलेलेच आहे. इ. ८ वी, ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांना आपण महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेला बसण्यास प्रोत्साहन द्यावे, ही विनंती आहे. कळावे,

आपला स्नेहांकित

**डॉ. ए. एस. लिमये**

**मानद संचालक, प्रज्ञा शोध व सर्वोत्कृष्टता केंद्र**

---

मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे

# प्रज्ञा शोध व सर्वोत्कृष्टता केंद्र

## महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा

**नौरोसजी वाडिया महाविद्यालय आवार, पुणे - ४११००१**

• वेबसाईट - **https://www.mtsexam.org** • ई-मेल - **ctsewadia@gmail.com**

• दूरध्वनी क्रमांक - **(020) 26168486** • फॅक्स - **(020) 26161479**

**महाराष्ट्र व इतर राज्यातील इ. आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी**

NTS - १० वी आणि इयत्ता १० वी व १२ वी पातळीवरील

**IIT प्रवेश, IISER प्रवेश, NEET, NDA प्रवेश, MHT-CET,**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडस्, KVPY या व इंजिनियरींग, मेडिकल कॉलेजसाठीच्या इतर प्रवेश परीक्षांच्या

***पायाभूत तयारीसाठी !***

# माहिती पत्रक

**महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा ..... तुम्हाला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी!**

**विद्वान होणे म्हणजे ज्ञानपिपासू होणे, पण प्रज्ञावान होणे म्हणजे त्या ज्ञानाचा विनियोग करून शहाणपण मिळविणे व सभोवतालच्या जगात नाविन्य निर्माण करणे.**

प्रज्ञावंत ही कोणत्याही राष्ट्राची, धर्माची, जातीची, स्थळाची, काळाची मक्तेदारी नाही. प्रचलित परीक्षा पद्धती प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेण्यास आणि त्यांना उत्तेजन देण्यास असमर्थ आहे आणि म्हणूनच प्रज्ञाशोध व सर्वोत्कृष्टता केंद्र, नौरोसजी वाडिया महाविद्यालय आवार, पुणे यांनी राष्ट्रीय व सामाजिक कर्तव्य भावनेतून प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेच्या माध्यमातून १९९२ पासून घेण्यास सुरुवात केली आहे.

### ✦ परीक्षेचे उद्देश :

१) प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
२) विद्यार्थ्याला राष्ट्रीय प्रज्ञा शोध (इ. १० वी) आणि भावी आयुष्यातील अन्य स्पर्धा परीक्षांची माहिती देणे.
३) स्पर्धा परीक्षांना बसण्याची व त्या परीक्षेत यश मिळविण्यासाठी लागणारी जिद्द लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.
४) निवडलेल्या प्रज्ञावान विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन त्यांचा गौरव करणे व उत्तेजन देणे.

### ✦ परीक्षेस कोणाला बसता येईल?

इ. ८ वी, ९ वी आणि १० वी चे सर्व विद्यार्थी या परीक्षेस बसू शकतात तसेच ९ वी, १० वी च्या एम्. टी. एस. ला. बसण्याकरीता इ. ८ वी किंवा ९ वी च्या एम्. टी. एस. ला. बसलेले / उत्तीर्ण झालेले असण्याची आवश्यकता नाही. ही परीक्षा राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेची तयारी करण्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठरली आहे व या परीक्षेतील अनेक शिष्यवृत्तीधारक राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेत उज्वल यश मिळवितात तसेच **इ. १० वीच्या राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेला बसण्यासाठी विद्यार्थ्यांनी इ. ८ वी किंवा इ. ९ वीच्या एम्. टी. एस. परीक्षेला बसलेले असणे आवश्यक नाही.**

### ✦ परीक्षेचे स्वरूप :

महाराष्ट्र प्रज्ञा शोध इ. ८ वी, इ. ९ वी व १० वी च्या परीक्षेचे स्वरूप सारखेच असेल.

**लेखी परीक्षा -** इ. ८ वी, ९ वी किंवा १० वी साठी दोन लेखी पेपर्स असतील व ते एकाच दिवशी सलग तीन तासात होतील. लेखी परीक्षेतील सर्व प्रश्न बहुपर्यायी असतील.

### ✦ परीक्षेचा अभ्यासक्रम :

**पेपर क्रमांक १ : मानसिक क्षमता कसोटी**

**अभ्यासक्रम -** इ. ८ वी साठी स्कॉलरशिपच्या बुद्धिमत्ता कसोटीच्या काठिण्य पातळीपेक्षा थोड्या वरच्या दर्जाचा असेल आणि इ. ९ वी व इ. १० वी साठी अनुक्रमे इ. ८ वी व इ. ९ वीच्या काठिण्य पातळीपेक्षा वरच्या दर्जाचा असेल.

**पेपर क्रमांक २: शालेय प्रवणता कसोटी**

**अभ्यासक्रम -** इ. ८ वीसाठी ८ वीच्या, इ. ९ वी साठी ९ वीच्या व १० वी साठी १० वीच्या विषयांचा संपूर्ण वर्षाचा शालेय अभ्यासक्रम असेल.

**मुलाखत :** इ. १० वी च्या लेखी परीक्षेतून निवडलेल्या विद्यार्थ्यांसाठीच असेल व एकूण गुण ५० असतील. मुलाखतीसाठी ठराविक, आखीव अभ्यासक्रम नाही. मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची शालेय विषयांची आकलनशक्ती, उपयोजन, विश्लेषण तसेच दैनंदिन जीवनातील देशी, परदेशी घडामोडींचे ज्ञान, त्यावरील टीकाटिपण्णी करण्याची क्षमता, ज्या परिसरात आपण रहातो त्या परिसराची माहिती, जोपासलेले विविध छंद, स्पर्धा, अभ्यासेतर उपक्रमातील सहभाग, इ. बाबींचा विचार केला जाईल.

**इ. ८ वी व इ. ९ वी ला मुलाखत असणार नाही.**

### ✦ परीक्षेची तयारी :

**शालेय प्रवणता कसोटी :** या करिता विद्यार्थ्याने त्या त्या वर्षाची क्रमिक पुस्तके वापरावीत. संपूर्ण वर्षाचा अभ्यासक्रम या परीक्षेकरिता अपेक्षित आहे.

**मानसिक क्षमता कसोटी :** या करिता अनेक प्रकाशकांची पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. विद्यार्थ्याने आपल्या सोईने या पुस्तकांचा वापर करावा. परीक्षेच्या तयारीसाठी मागील प्रश्नपत्रिका संच उपलब्ध आहेत. (पेपर १ + २) प्रत्येक इयत्तेकरिता या वर्षांच्या प्रश्नपत्रिकेसाठी रु. १७७/– रोखीने, पोस्टाने हवे असल्यास रु. २५०/– मनिऑर्डरने अथवा डिमांड ड्राफ्टने पाठवावेत. याकरिता आपली इयत्ता, संपूर्ण नाव, परीक्षेचे माध्यम व पत्ता कळविणे आवश्यक आहे.

✦ **परीक्षेचे माध्यम :** इंग्रजी, मराठी, उर्दू, हिंदी.

### ✦ परीक्षेचे केंद्र व परीक्षा क्रमांक :

**लेखी परीक्षा :** जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी या परीक्षेचे केंद्र दिले जाईल. परीक्षेचे केंद्र मिळविण्यासाठी त्या तालुक्यातून / जिल्ह्यातून इ. ८ वी, ९ वी व १० वी मिळून कमीत कमी १५० विद्यार्थी असणे आवश्यक आहे. एखाद्या ठिकाणी संख्या कमी असल्यास जवळच्या तालुक्याच्या ठिकाणी सोय केली जाईल.

इ. ८/९/१० वी च्या विद्यार्थ्यांचा परीक्षा केंद्र क्रमांक, परीक्षेचे स्थळ आणि परीक्षा क्रमांक, इत्यादी माहिती विद्यार्थी ज्या शाळेत शिकत आहे तेथे कळविण्यात येईल.

**मुलाखत :** १० वीच्या लेखी परीक्षेतून निवडलेल्या विद्यार्थ्यांची मुलाखत नौ. वाडिया कॉलेज, पुणे येथे घेण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या सोयीच्या दृष्टीने इतरत्र मुलाखतीची सोय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. त्याकरिता पुरेशी विद्यार्थी संख्या असणे जरूरीचे आहे. मुलाखतीला विद्यार्थ्याला स्वखर्चाने यावे लागेल.

**इ. ८ वी व इ. ९ वी ला मुलाखत असणार नाही.**

इ. १० वी च्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती विषयीची माहिती व परीक्षेचा संपूर्ण निकाल www.mtsexam.org या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येईल.

### ✦ परीक्षेचे व निकालाचे वेळापत्रक :

१) लेखी परीक्षा **बुधवार दि. २६ एप्रिल २०२३** या दिवशी, सकाळी ११ ते दुपारी २ या दरम्यान घेण्यात येईल. परंतु विद्यार्थ्याने सकाळी १०.३० ला आपल्या जागेवर हजर राहणे आवश्यक आहे.

२) इ. १० वी च्या ज्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षेतून निवड होईल, त्यांना मुलाखतीसाठी **२५ मे ते ५ जून** च्या दरम्यान बोलाविले जाईल. त्यासंबंधी विद्यार्थ्याला त्याच्या घरच्या पत्त्यावर पत्र पाठविले जाईल तसेच शाळेलाही कळविण्यात येईल. मुलाखती संबंधी पत्रे या केंद्रातून **१५ मे** च्या दरम्यान पोस्टात टाकली जातील.

३) इ. ८ वी, ९ वी व १० वीच्या इतर सर्व विद्यार्थ्यांना त्यांचा संपूर्ण निकाल त्यांच्या शाळेच्या पत्त्यावर पोस्टाने कळविण्यात येईल व तसेच आमच्या वेबसाईटवरही देण्यात येईल.

### ✦ पारितोषिके व अन्य बक्षिसे :

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेची गुणवत्तायादी दोन स्तरावर असेल.

**(अ) राज्यस्तरीय गुणवत्ता यादी (ब) जिल्हास्तरीय गुणवत्ता यादी :** प्रत्येक स्तरात ग्रामीण व शहरी असे दोन विभाग असतील. शहरी विभागात सर्व जिल्ह्यांची ठिकाणे व महानगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या शाळा समाविष्ट केल्या जातील. सर्व खेडी व तालुक्याची गावे ही ग्रामीण समजण्यात येतील. बक्षीसासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ही एकूण बसलेले विद्यार्थी व त्यांनी मिळविलेले गुण यावर अवलंबून असेल.

**१) राज्यस्तरीय पारितोषिक :** राज्य गुणवत्तायादीतील विद्यार्थ्यांना **रु. १०००/–** चे महाराष्ट्र प्रज्ञा शोध पारितोषिक एक वर्षाकरता देण्यात येईल.

**२) जिल्हास्तरीय पारितोषिक :** जिल्हा गुणवत्तायादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. ४००/– चे पारितोषिक एक वर्षाकरता देण्यात येईल.

**३) विशेष पारितोषिके : (अ)** ज्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय अथवा जिल्हास्तरीय पारितोषिकासाठी निवड झाली नसेल अशा निवडक विद्यार्थ्यांना रु. २००/– विशेष पारितोषिक एक वर्षाकरिता दिले जाईल.

**(ब) तालुका पारितोषिके :** प्रत्येकी रु. १५० एक वर्षाकरता, राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व विशेष पारितोषिक यादीत नसलेल्या परंतु तालुक्यात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या काही विद्यार्थ्यांना देण्यात येईल. हे पारितोषिक फक्त ग्रामीण भागासाठी असेल.

**(क) उत्तेजनार्थ पारितोषिके :** याशिवाय काही विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिके एक वर्षाकरिता देण्यात येतील.

**(रु. १००/– प्रत्येकी)**

**(ड) गुणवत्ता पारितोषिके :** राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील प्रत्येक विभागात गुणानुक्रमे पहिल्या तीन विद्यार्थ्यांना **रु. ५०००/–, रु. ३०००/– व रु. २०००/–** ची पारितोषिके देण्यात येतील.

लेखी परीक्षेतील प्रत्येक पेपरमध्ये व विभागात (गणित, नैसर्गिक शास्त्र व सामाजिक शास्त्रे) प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास **रु. ५००/–** चे स्वतंत्र बक्षीस देण्यात येईल.

जर जास्त विद्यार्थ्यांना एखाद्या विषयात अथवा पेपरमध्ये सर्वाधिक गुण मिळाले तर ही पारितोषिके विभागली जातील परंतु प्रत्येकास किमान **रु. १००/–** देण्यात येतील.

**(इ) इतर माध्यम पारितोषिक : रु. ४००/–** चे पारितोषिक हिंदी, उर्दू माध्यमाच्या एकूणात ५० टक्क्याहून अधिक व जास्तीत जास्त गुण मिळविणाऱ्यास देण्यात येईल.

४) लेखी परीक्षेत २०० पैकी ७० किंवा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रके देण्यात येतील.

### ✦ अर्ज कसा मिळवावा ?

आपल्या शाळेतून जेवढे विद्यार्थी बसणार असतील त्यांची (इ. ८/९/१० वी) यादी आपल्या शाळेच्या लेटरहेडवर पाठविल्यास आम्ही आपल्याला फॉर्म पाठवू. पैसे नंतर भरलेल्या फॉर्म बरोबर पाठविले तरी चालतील. न वापरलेले फॉर्म परत पाठवावेत.

### ✦ परीक्षेचे शुल्क :

१) शाळेमार्फत अर्ज मागविल्यास प्रत्येकी **रु. २००/–**

२) व्यक्तिश: अर्ज पोस्टाने मागविल्यास **रु. २५०/–** पाठवावेत.

३) या कार्यालयातून / आमच्या समन्वयकांकडून अर्ज घेतल्यास

**रु. २००/–** रोख द्यावेत.

४) https://www.mtsexam.org या आमच्या वेबसाईट वरून ऑनलाईन अर्ज भरता येतील तसेच परीक्षा फी सुद्धा ऑनलाईन भरता येईल. (यासाठी Credit Card/Debit Card/Net Banking/UPI हे सर्व पर्याय उपलब्ध आहेत.)

**ऑनलाईन अर्ज भरताना एकूण रु. २१५/– प्रति विद्यार्थी भरावे लागतील.**

पोस्टाने अर्ज मागविताना विद्यार्थ्याने **नाव, पिनकोडसहित संपूर्ण पत्ता व इयत्ता सुस्पष्ट अक्षरात लिहावे.** मनिऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट **मानद संचालक, महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा, पुणे** यांचे नावे पुण्यात प्राप्त होईल अशा रितीने पाठविणे.

**चेक स्वीकारले जाणार नाहीत.**

आपल्या शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या परीक्षेला बसण्यास उद्युक्त करावे, ही विनंती. आपल्या शाळेतील ८/९/१० वी चे किती विद्यार्थी परीक्षेला बसू इच्छितात, हे कळविल्यास तेवढी आवेदन पत्रे आम्ही आपणास पाठवू.

**परीक्षे संदर्भातील अद्ययावत माहिती www.mtsexam.org या वेबसाईटवर उपलब्ध असेल. त्यासाठी वेळोवेळी वेबसाईट पहावी. नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

### ✦ प्रश्नपत्रिकेचे स्वरूप :

| इयत्ता | पेपर क्र. १ | पेपर क्र. २ | एकूण | | | मुलाखत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रश्न | गुण | वेळ | |
| ८ वी<br>९ वी<br>१० वी | **मानसिक क्षमता कसोटी**<br>१०० प्रश्न,<br>१०० गुण<br>एकूण १०० प्रश्न,<br>१०० गुण,<br>वेळ ९० मिनिटे | **शालेय प्रवणता कसोटी**<br>**विज्ञान**<br>(भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) ४० प्रश्न,<br>**सा. शास्त्र**<br>(इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र) ४० प्रश्न,<br>**गणित**<br>(बीजगणित, अंकगणित, भूमिती) २० प्रश्न<br>एकूण १०० प्रश्न, १०० गुण, वेळ ९० मिनिटे. | २०० | २०० | १८० मिनिटे | इयत्ता ८ वी. ९ वी साठी मुलाखत नाही.<br>इयत्ता १० वी साठी ५० गुण |

## *अर्ज पाठविण्यासाठी अंतिम मुदत*

## शनिवार, दि. २१ जानेवारी २०२३

**७५/– रु. विलंब शुल्कासहित शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२३**

## कृपया आपल्या अर्जांची मागणी ताबडतोब नोंदवा.

### महत्त्वाची सूचना

**काही संस्था इतर काही इयत्तांसाठी महाराष्ट्र प्रज्ञा शोध या नावानेच परीक्षा घेत आहेत. अशा परीक्षांशी आमचा काहीच संबंध नाही. आमची संस्था फक्त इयत्ता आठवीसाठी, नववीसाठी व दहावीसाठी महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा आयोजित करीत असते याची कृपया नोंद घ्यावी.**

**महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेच्या प्रकल्पात काम करणारे शिक्षक, समन्वयक किंवा पदाधिकारी हे सेवाभावी वृत्तीने यात सहभागी होतात. या कामाकरता कोणतेही कमिशन अथवा आर्थिक लाभ त्यांना मिळत नाही.**